**फौजदारी चौकशी अर्ज क्र.४२/२०२२ मध्ये नि.क्र.५ वर आदेश.**

अस्मा सर्फराज शहा –१.

विरुध्द

सर्फराज हुसेनमिया शहा –२.

(सीएनआर क्र.**MHRG**13000–175–2022.)

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी अंतरिम दाद म्हणजेच अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्जदार क्र.१ व सामनेवाला यांचा विवाह दिनांक २७/१२/२०२० रोजी मौजे हर्णे, ता. दापोली, जि. रत्नागिरी येथे मुस्लीम धर्म शास्त्राप्रमाणे संपन्न झाला. सदर विवाहानंतर सामनेवाला क्र.१ हे अर्जदार हिस सासरी एकत्र कुटुंबिया सोबत नांदावयास घेवुन गेले. अर्जदार क्र.१ हया त्यांच्या सासरी सासु, सासरे, लहान दिर यांच्या समवेत राहत होत्या. तसेच सामनेवाला क्र.१ यास बहिणी निलोफर साजीद शेख व शबुफ्ता सौद मुकादम या असून त्यांचा विवाह झालेला आहे. अर्जदार क्र.१ यांना सामनेवाला क्र.१ यांनी विवाहा नंतर दोन दिवसांनी मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. अर्जदार क्र.१ यांना विवाहा नंतर दोन दिवसांनी मासीक पाळी आली असता सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला म्हणाला की, ''तुला मासीक पाळी आलीच कशी, मला मुल हवयं, तुला जर मुल झाले नाही तर मी तुला घटस्फोट देईन.'' तसेच सामनेवाला क्र.३ यांनी देखील त्याच कारणासाठी अर्जदार क्र.१ यांना शिवीगाळ केली.

०३. अर्जदार क्र.१ यांनी पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१ हा घरी आल्यानंतर सामनेवाला क्र.२ ही ''तुझी बायको काम करत नाही बसुन राहते, फुकटचे खाते'' अशी कान भरणी करत असे. त्यामुळे सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिस मारझोड व शिवीगाळ करत

असे. सामनेवाला क्र.१ ते ३ हे अर्जदार क्र.१ वर क्षुल्लक कारणाने संशय घेणे, घरात वाद घालणे, अश्लील शिवीगाळ करणे, अपशब्द वापरणे, अर्जदार क्र.१ च्या माहेरच्यांची लायकी काढणे असे कृत्य करत होते.

०४. अर्जदार क्र.१ यांनी पुढे असे कथन केले आहे की, विवाहाच्या वेळी सामनेवाला क्र.१ यांच्याकडून अर्जदार क्र.१ हिला अडीच तोळे मेहेर मिळाले ते सामनेवाला क्र.२ ने अर्जदार क्र.१ कडून काढुन घेतले.

०५. अर्जदार क्र.१ यांनी पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१ ते ३ हे अर्जदार क्र.१ यांना त्यांच्या माहेरील मंडळी कडून नवीन फर्निचर आणण्याचा तगादा लावला. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस धमकावले की, '' जर तु फर्निचर आणले नाहीस तर तुला हया घरात नांदता येणार नाही.'' अर्जदार क्र.१ ने सदर गोष्टीला विरोध केल्यावर सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदार क्र.१ हिला मानसिक व शारीरिक त्रास देत असे. सदर त्रासाला कंटाळुन अर्जदार क्र.१ यांनी घडलेला सर्व प्रकार माहेरी सांगितला. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिच्या आईने हालाखीची परिस्थिती असून देखील दुस–याकडून हातउसने पैसे घेवुन रक्कम रुपये एक लाखाचे फर्निचर व साठ हजार रुपयाचे इलेक्ट्रॉनिक भांडी पाठवुन दिले.

०६. अर्जदार क्र.१ यांनी पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१ ने त्याच्या डोक्यावर केस लावण्यासाठी अर्जदार क्र.१ हिस माहेरुन एक लाख रुपये आणावयास सांगितले. अर्जदार क्र.१ ने सदर रक्कम आणण्यास नकार दिला असता सामनेवाला क्र.१ ने अर्जदार क्र.१ ला अपमानास्पद वागणुक देवून शिवीगाळ करुन ठार मारण्याची धमकी दिली.

०७. अर्जदार क्र.१ यांनी पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदार क्र.१ यांना त्यांच्या घरावरील स्लॅप करीता माहेरुन पंधरा लाख रुपयाची मागणी केली. फेब्रुवारी २०२१ मध्ये अर्जदार क्र.१ ही गरोदर राहिली. अशा परिस्थितीत सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ ची काळजी घ्यावयाची सोडुन रात्री बेरात्री रुम बाहेर फोनवर बोलत असे. त्यानंतर अर्जदार क्र.१ तपासणी करीता दिनांक १२/०३/२०२१ रोजी माहेरी मौजे आराठी येथे आली. त्यावेळी दवाखान्याचा व औषधोपचारा खर्च अर्जदार क्र.१ च्या आईने केला. त्यानंतर दिनांक ०८/०४/२०२१ रोजी अर्जदार क्र.१ यांना त्यांच्या आईने अर्जदार क्र.१ ला तिच्या सासरी हर्णे येथे घेवून गेली.

०८. अर्जदार क्र.१ यांनी पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१ ते ३ यांच्या जाचाला कंटाळुन अर्जदार क्र.१ यांनी त्यांच्या व बाळाच्या जिवाला धोका असल्या कारणाने दिनांक २७/०४/२०२१ रोजी त्यांच्या आईला बोलावुन घेतले व त्या त्यांच्या आई सोबत मौजे आराठी येथे निघुन आल्या.

०९. अर्जदार क्र.१ यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ ही आर्थिक दृष्टया पुर्णतः त्यांच्या आईवर अवलंबुन आहे. अर्जदार क्र.१ ही कोणतीही नोकरी अथवा व्यवसाय करत नाही. तिला तिचा दैनंदिन खर्च भागवण्यासाठी पुर्णतः त्यांच्या आईवर अवलंबुन राहावे लागते.

१०. अर्जदार क्र.१ यांनी पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र.२ यांना अजुन एक अपत्य असून तो देखील चांगला कमविता आहे व तो सामनेवाला क्र.२ हिची जबाबदारी पेलण्यास पुर्णतः सक्षम आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.१ वर अर्जदार यांच्या व्यतिरिक्त कोणतीच जबाबदारी

नाही. तसेच सामनेवाला क्र.१ हा वाहन चालक असून तो महिना चाळीस ते पंच्चेचाळीस हजार रुपये इतके कमवत आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.१ हा अर्जदार यांचे पालनपोषण करु शकतात. तसेच सामनेवाला क्र.१ व २ यांचे मौजे लोखंडी मोहल्ला बाजार पेठ, पो. हर्णे, ता. दापोली, जि. रत्नागिरी येथे घरदार व बागायत आहे. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ व २ यांचे पालनपोषण करणे कामी आर्थिक दृष्टया सक्षम असून सामनेवाला क्र.१ याच्यावर इतर कोणाचीही जबाबदारी नाही. अर्जदार यांना उदर निर्वाहाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार व सामनेवाला यांचे नाते संबंध पाहता अर्जदार हिचे पालनपोषण करण्याची नैतिक जबाबदारी ही सामनेवाला क्र.१ ची असल्याचे कथन अर्जदार क्र.१ यांनी केले आहे.

११ अर्जदार क्र.१ यांनी त्यांना व अर्जदार क्र.२ यांना सामनेवाला क्र.१ यांच्याकडून पालनपोषणा करीता पोटगीची रक्कम दरमहा दहा हजार रुपये देण्याची विनंती केली आहे.

१२. सामनेवाला क्र.१ ते ३ यांना नोटीस प्राप्त झाल्यानंतर सदर कामी हजर होवून त्यांनी नि.क्र.१५ कडे म्हणणे दाखल केले. सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदार हिचा सदरचा अर्ज मान्य व कबुल नसल्याचे कथन केले आहे. अर्जदार ही तिच्या माहेरी स्वतःहुन गेलेली असल्यामुळे तिला निर्वाह भत्ता मागण्याचा अधिकार नाही. तसेच सामनेवाला यांना नाहक त्रास व्हावा या हेतुने सदरचा अर्ज दाखल केला असल्याचे कथन सामनेवाला यांनी केले आहे.

१३. सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ यांचे दुसरे पती आहेत. अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र.१ सोबत फक्त दोन महिने सहा दिवस राहिली.

अर्जदार क्र.१ हिला तिच्या आई शिवाय जमत नसल्यामुळे, अर्जदार क्र.१ च्या आईला घर जावई पाहिजे असल्यामुळे अर्जदार क्र.१ च्या पहिल्या पतीपासुन पाच महिन्यातच पैसे घेवून घटस्फोट घेतलेला आहे.

१४. सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ हिच्या अर्जातील कलम २, ३, ४, ५, ६, ७ कडील मजकुर मान्य व कबुल नाही. अर्जदार क्र.१ हिला नांदायचे नसल्याने सामनेवाला क्र.२ यांनी त्यांची तीन तोळयाची चैन व लग्नात घातलेले दागिने, कपडे घेवून माहेरी निघुन गेली आहे. सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ कडे माहेरहुन पैसे आणण्याची कधीही मागणी केलेली नसून पैशाकरीता अर्जदार क्र.१ चा छळ केलेला नाही अथवा केव्हाही मारहाण केलेली नाही, तसेच दमदाटी अथवा धमक्या दिलेल्या नाहीत. सामनेवाला क.३ यांचे २२ वर्षापुर्वीच लग्न झालेले असून ती अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांच्या पासुन वेगळी राहते. त्यामुळे सामनेवाला क्र.३ पासुन अर्जदार क्र.१ हिचा छळ होण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे कथन सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी केले आहे. सामनेवाला क्र.१ व अर्जदार क्र.१ च्या लग्नाच्या दोन वर्षापुर्वीच घराचे बांधकाम पुर्ण केलेले असल्यामुळे अर्जदार क्र.१ हिला पंधरा लाख रुपये मागण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे कथन सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी केले आहे.

१५. सामनेवाला क्र.१ ते ३ पुढे असे कथन केले आहे की, दिनांक २५/०७/२०२२ रोजी सकाळी ०७.०० ते ०७.३० च्या सुमारास अर्जदार क्र.१, तिची आई, बहीण, बहिनीचे पती हे सामनेवाला यांच्या घरी हर्णे, ता. दापोली येथे आले. त्यावेळी अर्जदार क्र.१ व तिचे सोबत आलेल्या कुटुंबियांनी सामनेवाला यांना अश्लील शिवीगाळी करण्यास सुरुवात केली. तसेच अर्जदार क्र.१ च्या बहिणीच्या पतीने सामनेवाला क्र.१ यांना अश्लील शिवीगाळी करुन अंगावर मारणेसाठी धावुन आले व धक्काबुक्की करुन

मारहाण केली. त्याबाबत सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ व तीच्या कुटुंबियांवर दापोली न्यायालयात केस दाखल केली आहे.

१६. सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ ही तिच्या माहेरी स्वतःहुन गेलेली आहे. तसेच सामनेवाला अर्जदारांचा सांभाळ करण्यास कधीही नकार दिलेला नाही. तसेच अर्जदार क्र.१ व २ यांच्या पालनपोषणाची जबाबदारी कधीही झटकली नाही. अर्जदार क्र.१ हिने एक पत्नी म्हणून सामनेवाला क्र.१ यास कधीही साथ दिलेली नाही. अर्जदाराने तिला मानसिक शारीरिक त्रास झाल्याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तसेच अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र.१ चे घर सोडुन गेली असताना देखील सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिला त्याच्या घरी आणण्याचा बराच प्रयत्न केला.

१७. सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१ वर त्याच्या आई वडीलांची, त्यांच्या औषधोपचाराची, पालनपोषणाची जबाबदारी आहे. तसेच सामनेवाला क्र.१ यास दरमहा किराणा सामान, लाईट बील, दुध, केबल कनेक्शन, सिलेंडर, कर्ज हप्ता, हारवाला, भाजी वगैरे खर्च सामनेवाला क्र.१ यांच्यावर असल्याचे कथन सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी केले आहे. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ व २ चा चांगल्या प्रकारे सांभाळ करण्यास आजही तयार असल्याचे कथन सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी केले आहे. तसेच अर्जदार क्र.१ हिला सामनेवाला क्र.१ याच्या बरोबर नांदावयाचे नसल्याने, ती स्वतः कमवती असल्यामुळे अर्जदार क्र.१ हिला अर्ज करण्याचा कोणताही अधिकार नसल्याचे कथन सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी केले आहे.

१८. सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ व २ यांच्या पालनपोषणाकडे कधीही दुर्लक्ष

केलेले नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी सदरचा अंतरिम अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

१९.     वरील परिस्थितीत उपस्थित होणारे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नमुद करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| ०१. | अर्जदार अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | | .. अंशतः होकारार्थी. |
| ०२. | आदेश काय ? | | .. अंतिम आदेशाप्रमाणे. |

:: **कारणमिमांसा** ::

२०.     अर्जदारातर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

**अर्जदारातर्फे वकिलांचा युक्तीवाद** :-

२१.     अर्जदारातर्फे वकिलांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार क्र.१ यांनी त्यांना शारीरिक व मानसिक छळ होत असल्यामुळे सदरचे प्रकरण दाखल केले आहे. अर्जदार क्र.१ ही दिनांक २७/०४/२०२१ रोजी पासून आजतागायत तिच्या आईकडे राहत आहे. अर्जदार या सामनेवाला क्र.१ वरती अवलंबुन आहे. सामनेवाला क्र.१ यांनी आर्थिक दृष्टया पती किंवा वडील म्हणुन कोणतीही जबाबदारी पार पाडलेली नाही.

सामनेवाला क्र.१ याच्यावर कोणीही अवलंबुन नाही. सामनेवाला क्र.१ यांचे उत्पन्न महिना चाळीस ते पन्नास हजार इतके आहे. सामनेवाला क्र.१ यांचे नावे अनेक मिळकती आहेत. त्यामुळे सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ व २ यांना पोटगी देवू शकत असल्याने सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

## **सामनेवाला तर्फे वकीलांचा युक्तीवाद** :-

२२. सामनेवाला क्र.१ हे आजही अर्जदार क्र.१ व २ यांना सांभाळण्यास तयार आहेत व अर्जदार यांना घरी नेण्यास तयार आहेत. अर्जदार क्र.१ ही स्वतः तिच्या इच्छेने माहेरी निघुन गेलेली आहे. सामनेवाला क्र.१ हा त्याच्या स्वतःच्या घरात राहत असल्यामुळे त्या कारणावरुन अर्जदार हिचेकडे पैशांची मागणी केली ही बाब खोटी व चुकीची आहे. सामनेवाला क्र.१ बरोबर असलेला विवाह हा अर्जदार क्र.१ यांचा दुसरा विवाह आहे. अर्जदार क्र.१ हिने तिच्या पहिल्या पतीकडून पैसे घेवून तिचा पहिला विवाह संपुष्टात आणलेला आहे. अर्जदार हिला अशा प्रकारे लोकांना फसवुन पैसे उकळण्याची सवय आहे. सामनेवाला क्र.१ यांच्यावर त्यांच्या आई वडीलांची जबाबदारी आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती सामनेवालातर्फे वकीलांनी केली.

## **मुद्दा क्र.१ बाबत –**

२३. एकंदरीत पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, अर्जदार क्र.१ व २ यांचे सामनेवाला सोबत असलेले नातेसंबंध सामनेवाला यांना मान्य आहे. त्यामुळे अर्जदार यांना सांभाळण्याची सामनेवाला क्र.१ याची नैतिक जबाबदारी आहे. अर्जदार क्र.१ ही स्वतः उत्पन्न मिळवते हे दर्शविणारा कोणताही पुरावा सामनेवाला यांनी पटलावर आणलेला नाही. यावरुन असे

दिसून येते की अर्जदार क्र.१ स्वतःपुरते देखील उत्पन्न मिळवू शकत नाही. अर्जदार क्र.१ व २ हे आर्थिकदृष्टया सामनेवाला क्र.१ यांचे वरतीच अवलंबुन आहे. सदर मुख्य अर्जाचा निर्णय होईपर्यंत काही कालावधी लागणार आहे. मुख्य अर्जाचा निकाल होईपर्यंत अर्जदार क्र.१ व २ यांना आर्थिक दृष्टया सांभाळणे ही सामनेवाला क्र.१ ची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. तसेच सामनेवाला यांनी अर्जदार हिचेवर मानसिक व शारीरिक छळ केला किंवा कसे ही बाब पुराव्याअंती शाबीत होण्याजोगी आहे.

२४. सामनेवाला क्र.१ हे सुशिक्षीत असून स्वतःपुरते व अर्जदारापुरते उत्पन्न नक्कीच मिळवू शकतात. याबाबत सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदाराचे कथन खोडून काढले नाहीत. परंतु अर्जदार यांनी सदर बाब दर्शविणारा कोणताही पुरावा पटलावर आणलेला नाही. सद्यस्थितीत अर्जदार यांचा आर्थिक सांभाळ ही बाब महत्वाची आहे. या सर्व कारणास्तव अर्जदार क्र.१ व २ यांच्या दैनंदिन खर्चासाठी, औषधपाण्यासाठी व इतर खर्चासाठी सामनेवाला क्र.१ यांची नैतिक जबाबदारी असल्याने सामनेवाला क्र.१ यांनी ठराविक रक्कम दरमहा देणे हे योग्य होणार आहे. अशा परिस्थितीत सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ व २ यांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी व इतर खर्चासाठी दरमहा रक्कम रुपये ५,०००/- प्रमाणे एकत्रितरित्या अंतरिम पोटगी सहजपणे देवू शकतो. सध्याची महागाई तसेच अर्जदार क्र.१ व २ यांचा दैनंदिन खर्च व औषधपाण्याचा खर्च याबाबी लक्षात घेता, अर्जदार क्र.१ यांना स्वतःसाठी व अर्जदार क्र.२ यांच्या पालनपोषणाकरीता एकत्रितरित्या रक्कम रुपये ५,०००/- दरमहा अंतरिम पोटगी देणे योग्य राहील. सदर अर्जाचा खर्चाबाबत अंतिम निकालाच्या वेळी आदेश करण्यात येईल. अशा परिस्थितीत मी मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

:: **आदेश** ::

०१. अर्जदार क्र.१ व २ यांचा सदरचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

०२. सामनेवाला क्र.१ यास असा निर्देश देण्यात येत आहे की, सदर आदेशाच्या तारखेपासून, त्यांनी अर्जदार क्र.१ व २ यांना दैनंदिन खर्चासाठी व औषधपाण्यासाठी एकत्रितरित्या दरमहा रुपये ५,०००/– (रुपये पाच हजार मात्र) प्रमाणे अंतरिम पोटगीची रक्कम म्हणून, प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत दयावी.

०३. सामनेवाला क्र.१ यास असाही आदेश देण्यात येत आहे की, त्यांनी दर महिन्याच्या ५ तारखेपुर्वी अर्जदार यांना दरमहा पोटगीची रक्कम दयावी.

०४ सदर आदेशाची प्रत विनामुल्य अर्जदारास देण्यात यावी.

( येणे प्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे. )

Sonali Dilip Javalgekar

Digitally signed by Sonali Dilip Javalgekar
Date: 2023.02.17 15:59:11 +0530

श्रीवर्धन.                ( एस. डी. जवळगेकर )
दिनांक – १५/०२/२०२३.        प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन.